## जनांची पिलावळ

एक हजार वर्षे हा देश इस्लामी आक्रमकांशी झुंजत होता. त्यांना या देशात निर्विवाद वर्चस्व कधीही प्रस्थापित करता आले नाही. बॅ. महंमद अली जिना या माणसाने हा इतिहास मोडला. या देशाच्या भूमीवर मुसलमानांचे स्वतंत्र, सार्वभौम राज्य निर्माण झाले. हा इतिहासातील आपला सर्वात मोठा पराभव होता. हा पराभव स्वीकारताना फार मोठी किंमत मोजावी लागली. लाखो हिंदूंना आपली संपत्ती, घरदार सोडून निर्वासित व्हावे लागले. हजारो आया-बहिणींवर बलात्कार झाले. असहायपणे त्यांना मृत्यूला कवटाळावे लागले. मुख्य म्हणजे आम्हीही हा पराजय मान्य केला. जिनांच्या मागणीपुढे मान तुकवीत या देशाचे तुकडे केले. आता तरी मुस्लिम समस्या कायमची संपेल म्हणून या देशातल्या लोकांनी निश्वास सोडला. पण... फाळणीला मुसलमानांची मानसिकता आणि काँग्रेसची धोरणे कारणीभूत होती. त्या इतिहासाचे पुन्हा एकदा तीव्रपणे स्मरण करण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण पाकिस्तान घेऊन बॅ. जिना जरी लवकरच पैगंबरवासी झाले तरी त्यांची पिलावळ मात्र भारतात कायम आहेत व राजकारणात सक्रिय आहे. काँग्रेसची सध्याची ध्येयधोरण पाहिली म्हणजे याच निष्कर्षावर यावे लागते.

राष्ट्रीय विकास परिषदेत तर पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी कहरच केला. अकराव्या पंचवार्षिक योजनेचे लाभ अल्पसंख्यकांना विशेषत: मुसलमानांना मिळाले पाहिजेत, असे स्पष्ट सांगितले. कारण काय तर या देशातील संसाधनांवर मुसलमानांचा पहिला हक्क आहे. पंतप्रधानांच्या कार्यालयाने सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. पण पंतप्रधान तसे बोलले ही वस्तुस्थिती आहे. मुसलमानांचा विशेषत्वाने, प्राधान्याने उल्लेख करण्याची गरजच काय होती? १०० कोटींच्या देशात गेल्या ६० वर्षांत ज्यांच्या पर्यंत विकासाचा एक किरणही पोहोचला नाही, असे करोडो लोक आहेत. विशेष म्हणजे ते सर्व जातीधर्माचे आहेत. असे असताना देशाच्या पंतप्रधानाने मुसलमानांना अशा पद्धतीने खूष करण्याचा प्रयत्न करणे, अत्यंत अनुचित आणि निषेधार्ह आहे.

सच्चर कमिटीच्या अहवालाचा संदर्भ त्यांच्या बोलण्याला निश्चितच आहे. एकंदरच या देशात मुसलमानांवर फारच अन्याय झाला. शिक्षणापासून ते सरकारी नोकरीपर्यंत सर्वच क्षेत्रांत त्यांचे हक्क डावलले गेले. सत्तेतही त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात वाटा मिळाला नाही. आता त्यांना आरक्षण द्या, सवलती द्या, उमेदवारी द्या, असा गोंजारण्याचा सपाटा काँग्रेसने लावला आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेत विकासाचे भव्यदिव्य लक्ष्य जनतेसमोर ठेवण्याची गरज होती. जाती, पंथ, धर्म या पलीकडे जाऊन सर्वांच्या मनात ती आकांक्षा जागविण्याकरिता त्यांनी प्रेरणा देण्याची अपेक्षा होती. पण त्यांच्या डोळ्यासमोर होता फक्त उत्तरप्रदेश. मुलायमसिंगांना हरविण्याचे सोनियाकृत संकुचित स्वप्न. सत्ताकांक्षेने हपापलेला माणूस मग कोणत्याही पातळीवर जाऊ शकतो. राष्ट्रीय विकास परिषदेत संसाधनांच्या हक्कांची भाषा पंतप्रधान करतात. देशाच्या नागरिकांच्या बाबतीत असा फरक असतो? सर्व नागरिक समान असतात. धर्माच्या, जातीच्या नावावर अशी हक्कांची भाषा भेदभावाला आणि संघर्षाला जन्म देणारी आहे.

सच्चर कमिटीने आणि पंतप्रधानांनी जो राग आळवायला सुरुवात केली आहे, तो अगदी फाळणीपूर्व मुसलमानांच्या मागण्यांशी तंतोतंत जुळणारा आहे. त्यांच्यावर ही परिस्थिती ते मुसलमान आहेत म्हणून आली, हे सरकारच आज जगाला ओरडून सांगत आहे. आतापर्यंत विकासाची फळे मुसलमानांपर्यंत पोहोचली नाहीत ती आता पंचवार्षिक योजनेत तरी पोहोचवा, हे पंतप्रधान जाहीरपणे कबूल करीत आहेत. एक तर आपण आपल्याच देशाच्या सन्मानाचे धिंडवडे काढीत आहोत. ज्या देशात अल्पसंख्य म्हणून कधी कोणावरही अन्याय झाला नाही, त्या देशात गेल्या ६० वर्षांत मात्र मुसलमानांना न्याय मिळाला नाही. हा या देशातील सहिष्णू व धर्मनिरपेक्ष जनतेचा अपमान आहे. ६० वर्ष काँग्रेसच्याच हातात सत्ता होती. तेच या पापाला जबाबदार आहे. अन्य कोणीही या परिस्थितीला कारणीभूत नाही, हेही त्यांनी जाहीरपणे कबूल केले पाहिजे.

सत्तेकरिता मुसलमानांचे तृष्टीकरण करणे म्हणजे पुन्हा आपण जुन्याच मार्गाने जात आहोत, असा त्याचा अर्थ आहे. देश तोडून दिल्यानंतरही आपण पुन्हा एकदा त्यांच्या हक्कांची भाषा करीत असू तर ती आपल्या इतिहासासोबत बेइमानी आहे. देशाचा विश्वासघात आहे. ४७ नंतर पाकिस्तान आणि बांगला देशात हिंदूंचे काय झाले? त्यांच्या हक्कांचे काय झाले? याचे उत्तर पंतप्रधान देतील काय? असा प्रश्न विचारणे देखील या देशात पाप झाले आहे.

भारतातल्या मुसलमानांची प्रगती झाली नाही, पण पाकिस्तान आणि बांगला देशात त्यांची काय स्थिती आहे? तेथे तर १०० टक्के त्यांना आरक्षण आहे. सरकारला त्यांच्या विकासाची इतकीच चिंता आहे तर अन्य नागरिकांप्रमाणेही काही कर्तव्ये असतात याची त्यांना जाणीव करून द्या. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासाच्या आड येणारी धर्मश्रद्धा सहन केली जाणार नाही, हेही कठोरपणे सांगा. दहशतवाद हाताळताना मुसलमान म्हणून भेदभाव केला जाणार नाही, हेही सांगा. पण सरकारला मुसलमानांचे

भारतीयीकरण करायचेच नाही. राजकारणाचे इस्लामीकरण करायचे आहे.

सच्चर कमिटीची भाषा आणि पाकिस्तानमध्ये इतिहासाच्या अभ्यासक्रमात होणारे बदल, यात एक विलक्षण सुसंगती आहे. पाकिस्तानने ९ व १० वीच्या इतिहासाच्या पुस्तकात बदल केला आहे. हिंदू व मुसलमान या आधारावर पाकिस्तानची निर्मिती झाली, असेच आतापर्यंत त्यांच्या इतिहासात शिकविले जायचे. पण यापुढे अखंड भारतातील मुसलमानांच्या सामाजिक व आर्थिक विषमतेमुळे फाळणी झाली, असे शिकविले जाणार आहे. मुस्लिम दहशतवाद हा शब्द सध्या बदनाम झाल्यामुळे पाकिस्तान निर्मितीचा नवा सिद्धान्त मांडल्या जातो आहे.

भारतातील मुसलमानांना पाकिस्तान कायम भडकविण्याचे काम करीत आला आहे. सच्चर कमिटी सुद्धा सामाजिक, आर्थिक विषमतेचीच भाषा बोलत आहे. सच्चर कमिटीला भारतातील मुसलमान नेतृत्वाकडून प्रभावित करून नव्या फाळणीचे हे पाकिस्तानचेच तर षडयंत्र नाही ना? मुशर्रफ यांचाच तर हा खेळ नाही ना? काँग्रेसचे नेते या नव्या चक्रव्युहात फसत आहेत आणि देशविघातक मानसिकता निर्माण करीत आहेत. नव्या संघर्षाला आमंत्रित करीत आहेत. पाकिस्तानच्या अघोषित युद्धाचे हे नवे डावपेच आहेत. देशाने सावध होण्याची वेळ आली आहे.

भूतकाळात केलेल्या चुका विसरून भविष्यकाळ निर्माण करता येत नाही. अवघ्या साठ वर्षांत इतिहासाची पुनरावृत्ती होणार असेल तर स्वस्थ बसून चालणार नाही. वस्तुस्थितीचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. आपल्या डोळ्यादेखत काश्मीरमधून अवघ्या ४५ वर्षांत हिंदूंना हाकलून देण्यात आले. ९/११नंतर मुस्लिम दहशतवादाचा जगात फार मोठ्या प्रमाणात अभ्यास केला गेला. या दहशतवादाचा संबंध शिक्षण, दारिद्र्य, मागासलेपणा या सोबत नसून, इस्लामशी आहे, हा त्या अभ्यासाचा एकजात निष्कर्ष आहे. एखादा मुसलमान गरीब आहे म्हणून 'वंदे मातरम्' नाकारत नसतो. प्रगती झाल्यामुळे मुसलमान एखाद्या राष्ट्रीय प्रवाहात समरस झाला, असे अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया अशा कोणत्याही देशातला अनुभव नाही.

अजूनही आपण मुसलमान म्हणून विचार करणार असू, तर तो आपल्या स्वातंत्र्याशी, घटनेशी, धर्म निरपेक्षतेशी द्रोह आहे. काँग्रेसच्या नादी लागून आता तरी हिंदू आपला भविष्यकाळ अंधकारमय करण्याची चूक करणार नाहीत, अशी अपेक्षा करू या. मुसलमानांचा जो कळवळा दाखविला गेला तो या देशाचा अपमान आहे व पंतप्रधानांनी त्यासाठी देशाची क्षमा मागितली पाहिजे, पण बुडत्याचे पाय खोलाकडे असतात, तसे काँग्रेस व पंतप्रधानांचे झाले आहे. त्यामुळे ते क्षमा मागणार नाही, हेही स्पष्ट आहे. त्यांना धडा शिकविण्याशिवाय पर्याय नाही.